# महाराष्ट्र शासनाच्या स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार स्पर्धेसाठी प्रवेशिका व पुस्तके पाठविण्याचा कालावधी दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१८ पर्यंत

मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी प्रकाशन वर्ष २०१७ करिता राज्य शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठीच्या प्रवेशिका जिल्हाधिकारी कार्यालयात, तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१८ पर्यंत पाठविता येणार आहेत. दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत. या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ यांच्या कार्यालयात तसेच मुंबई वगळता अन्यत्र संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्व साधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध होतील. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर 'नवीन संदेश' या सदरात 'स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०१७ नियमावली व प्रवेशिका' या शीर्षाखाली व 'What's new' या सदरात 'Late Yashwantrao Chavan State Literature Award 2017 Rules Book and Application Form' या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http://msblc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील. प्रवेशिका पूर्णत: भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक ३१ जानेवारी, २०१८ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात. लेखक/प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. मुंबईतील लेखक/प्रकाशकांनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. मुंबई वगळता अन्य ठिकाणच्या लेखक/प्रकाशकांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हे साहित्य दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१८ पर्यंत पाठवावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. लेखक/प्रकाशकांनी मंडळाकडे प्रवेशिका व पुस्तके पाठविताना सदर बंद लिफाफ्यावर/पाकीटावर 'स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०१७ साठी प्रवेशिका' असा स्पष्ट उल्लेख करावा. विहित कालमर्यादेनंतर (१ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१८) येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धेसाठी स्विकारल्या जाणार नाहीत.

**महाराष्ट्र शासन**

## स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना

# नियम व माहिती

---


**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**

रवींद्र नाट्य मंदिर इमारत, २ रा मजला,
पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनी क्रमांक - २४३२५९३१/ फॅक्स क्र. २४३२ ५९३१
संकेतस्थळ - http://www.msblc.maharashtra.gov.in
ई-मेल - secretary.sblc-mh@gov.in


Raut